नि.दि.दा.क्र.३७/२०१७
मंजुळाबाई वि. गणपत वगैरे
निशानी - ४८

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री पी. एस. सायरे वकील साहेब शपथेवर सुरू:**

३. माझा जन्म साधरण ८०-९० वषापुर्वी झाला असेल. माझे शिक्षण दुसरी पर्यंत झाले आहे. माझे वडीलांचे गाव पोटगाव तालुका मौदा जिल्हा नागपूर होते. माझे वडील मिळून एकूण ४ भावंडे होते. माझे लग्न १३ व्या वर्षात झाले. मला बखारी पिपळा येथे लग्नानंतर दिले होते. माझे वडील सन १९५३ साली मरण पावले. माझे वडील पारशिवनी येथे मयत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मयत झाल्यानंतर मी दयाराम कांबळे याच्याकडे राहत होती. दयाराम कांबळे माझे मामा होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न दयाराम कांबळे यांनी करून दिले होते. मला दयाराम कांबळे यांनी घर पाडल्यानंतर त्याच्यासोबत राहायला नेले होते. नेमके वर्ष आठवत नाही. माझा भाउ वसंत कोणत्या वर्षी मयत झाला हे मी सांगू शकत नाही.

(Learned advocate Shri M. D. Paliwal for the plaintiff raised objection about the questions are without pleading and cannot permit to put to the witness. Per contra learned advocate Shri P.S. Sayare argued that the questions are related to fact in issue and source of the title. Hence, he may be allow to put the question. Considered submissions of both sides, I am of view that, the relevancy of the questions might be related to fact in issue. Therefore, it cannot be decide at this juncture. Therefore, permission granted subject to the objection of without pleading.)

४. हे मला माहीत नाही की, वसंत याला घरकूल योजनेत घर मिळाले होते. साक्षीदार सांगते की, त्याने घेतले होते, व त्यावर बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर खारीत, तहसील पारशिवनी येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वसंत हा २००८ साली मयत झाला. हे म्हणणे खरे नाही की, वसंत याला बांधकाम करण्यासाठी मी हरकत केली नव्हती. शपथपत्र मला वाचून दाखविण्यात आले आहे. शपथपत्रातील मजकूर मोहल्लयातील मजकूर लोकांने वाचून दाखविले होते. शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. शपथपत्रातील मजकूर मला माहीत नाही. दाव्यात काय मजकूर लिहीला आहे मला माहीत नाही, परंतू वाचून दाखवला तर समजेल.

५. यापुर्वी दावा मी घरासाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घरात मला हक्क प्राप्त झाला नाही म्हणून मी पुर्वीचा दावा मागे घेतला. वाद मिळकतीचे घर माझ्या वडीलांच्या मालकीचे होते हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागदपत्र उपलब्ध नाही. माझ्या वडीलांनी वाद मिळकत विकत घेतली होती. माझ्या वडीलांनी वाद मिळकत विकत घ ेतल्याचे कागदपत्र उपलब्ध नाही. सगळे कागदपत्र गायब करण्यात आले आहे. कागदपत्र गहाळ झाल्याबाबत मी पोलिसांना तक्रार केली नाही. कागदपत्रांच्या सत्य प्रति उपलब्ध झाल्या नाही. माझ्या वडीलांनी ८९६ चौरस फुट जागा मला दिली होती, याबाबतचे कागदपत्र उपलब्ध नाही. साक्षीदार सांगते की, माझे वडील सांप चावल्यामुळे लगेच मरण पावले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलानी मला ८९६ चौरस फुट जागा दिली नव्हती.

६. वाद मिळकतीचा घर क्रमांक मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.८ ला जागा विकली त्या विरोधात मी पोलिस तक्रार केली नाही. जागेची आराजी मी निश्चितपणे सांगु शकत नाही. निबाच्या झाडा

पासून ते सावनेर रोड पर्यंत जागा आहे. मी माझे वडील मयत झाल्यापासून घर पट्टी भरत आहे. सदर घर पट्टीचे कागद मी दाखल केले नाही कारण ते कागद घरी आहे. मला वाद मिळकतीचा सिटी सर्वे क्रमांक माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वार्ड क्र.३ मध्ये घर क्र.१३१६ माझे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००३ पासून मी वार्ड क्र.३ येथे राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला राहायला जागा नव्हती म्हणून मी तहसीलदाराकडे पट्टा मिळण्यासाठी अर्ज केला होता.

७. माझे नाव वाद मिळकतीला लागले नाही कारण माझे वडील त्यापुर्वीच मरण पावले. वाद मिळकतीवर माझे नाव लागावे म्हणून मी सन २०१६ पर्यंत अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांचा वाद मिळकतीवर कोणताही हक्क व अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा वाद मिळकती पैकी ८५१.६४ चौरस फुट जागेचा मालक होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या आखिवपत्रिकेवर प्रतिवादी क्र.१ व मयत वसंत याचे नाव सुरूवाती पासून दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, वसंत आणि प्रतिवादी क्र.१ यांचे नाव लागल्यापासून वाद मिळकत त्यांच्या ताब्यात आहे. माझ्या ताब्यात किती जागा होती हे मी निश्चित मोजमाप सांगु शकत नाही. वाद मिळकतीच्या पुर्वेस मांग पुरा, पश्चिमेस बॅक आहे, उत्तरेस बाजार आणि दक्षिणेस धनगर लोकांचे घरे आहे.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृत**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**
**दिंनाक:१७/०१/२०२३**

**समक्ष**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**

## पुढील उलटतपास शपथेवर श्री सायरे वकील साहेबः

८. वाद मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ किती आहे हे मी सांगु शकत नाही. माझ्या वडीलांनी वाद मिळकत कधी घेतली हे मी सांगु शकत नाही मी त्यावेळी लहान होती. वाद मिळकत माझ्या आजोबांची नव्हती. वाद मिळकत गोंड समाजाच्या व्यक्तीकडून घेतली होती त्याचे नाव मला माहीत नाही. स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी विक्रीपत्र करावे लागते याची मला माहीती आहे. हे मला माहीत नाही की माझ्या वडीलांनी विक्रीपत्र गोंड समाजाच्या व्यक्तीकडून करुन घेतले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सन २००३ पासून खारी येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की खारी येथे मला घरकुल योजनेत घर मिळाले आहे.

९. मी ज्या घरात राहते त्या घराचा घर क्रमांक मी सांगु शकत नाही. हे मी सांगु शकत नाही की वाद मिळकतीचा घर क्र.७८ आहे किंवा नाही. मला शपथपत्र वाचून दाखवले आहे. माझ्या वडीलानी ८९६ चौरस फिट जागा मला केंव्हा दिली हे मी सांगु शकत नाही. शपथपत्रात व दाव्यात काय मजकुर लिहीला आहे हे मला माहीत नाही. माझ्या वडीलानी कोणत्या कागदपत्रानव्ये वाद मिळकत मला दिली हे मी सांगु शकत नाही. माझे वडील वाद मिळकतीचे मालक होते हे दाखविण्यसाठी माझ्याकडे कागदपत्रे नाही. नगरपंचायतीचा कर केंव्हा पासून भरत आहे हे मी सांगु शकत नाही. माझे नाव नगरपंचायत रेकार्डला मी घर बांधल्यानंतर लावले होते. हे मला माहीत नाही की, गणपतच्या नावे घर क्रं.७८ होते.

१०. दाव्यात आणि शपथपत्रात घर क्र.७८ चा उल्लेख का केला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे मला माहीत नाही की, घर क्र.७८ आणि वाद मिळकतीचा संबंध आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की वाद मिळकतीशी आणि दाव्याशी गणपत रामटेकेचा संबंध नाही. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१ ला विक्री केलेल्या मिळकतीचा क्र.७८ आहे किंवा नाही. मी वाद मिळकतीमध्ये राहत होते हे दाखविण्यासाठी विज बिल, पाणी बिल यापॅकी काही माझ्याकडे नाही. हे म्हअणणे खरे आहे की, वसंता आणि गणपत यांच्यात वाटणी झाली होती. (वादीचे वकील श्री

पालीवाल यांनी या प्रश्नास हरकत घेतली की नि.६१ वरील अर्जानुसर प्रतिवादीनी वाटणी बाबत कैफियत दुरुस्तीकरीता अर्ज केला होता सदर अर्ज नामंजुर करण्यात आला होता. सदर प्रश्न हा विदाउट प्लीडींग असल्याने साक्षीदारास विचारता येणार नाही. उलट सायरे वकील यांनी कथन केले की उच्च न्यायालयात त्या आदेशाविरुध्द अपिल करण्यात आलेले आहे पुढील तारखेस त्या अपिलाची प्रत दाखल करत आहे. हरकत पुढील तारखेपर्यत राखून ठेवण्यात आली.) (Learned advocate Shri. Sayare has made submission on the basis of information provided by defendant no.8. Note kept on record.)

अपिलाची प्रत दाखल करण्याची मुद्त देवून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृती, समक्ष,

(ओ.जे कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पारशिवनी
दिः१८.०७.२०२३

(ओ.जे कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पारशिवनी

उलटतपास पुर्ण.

फेर-तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(ओ.जे कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पारशिवनी

समक्ष,

(ओ.जे कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,